# सेवाव्रती डॉ.गजानन डांगे



*उघडा बोडका सातपुडा नि सह्याद्रीचा मिलाफ जेथे होतो त्या नंदुरबार जिल्ह्यातील वनवासींवर तेथून परागंदा व्हायची वेळ येऊन ठेपली. पण अलिकडे थोडा बदल जाणवू लागला आहे. पॅसेंजर मध्ये लाकडाची मोळी कोंबणारा वनवासी बंधू आता भाजीपाल्याचे ओझे सुरतेकडे नेऊ लागला आहे. हा बदल असा अचानक झाला का? ह्या बदलामागे शासनाच्या कृषी खात्याची करामत आहे का? ह्याची उत्तरे ज्याने त्याने शोधावित. परंतु आम्हाला या बदला मागे काहीना काही प्रमाणात नंदुरबारचे कृषी विज्ञान केंद्र असल्याचे जाणवले. व्यक्तिच्या मोठेपणापेक्षा समाजाला, संस्थेला मोठं माणणाऱ्या डॉ. हेडगेवार सेवा समिती संचलित या विज्ञान केंद्राने नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल करायला सुरुवात केली आहे. त्यात समितीच्या संचालक मंडळाचा सहभाग आहेच, परंतु विज्ञान केंद्राच्या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या डॉ. गजानन डांगेचा सहभाग अधिक महत्वाचा आहे.*

**चिंतामण पाटील**

**का**ही वर्षांपूर्वी नंदुरबारवरुन सुरतला जातानाचा प्रवास आठवला. भुसावळ–सुरत पॅसेंजरने नंदुरबार सोडले की गाडी जंगल झाडीतून जायची. मग पुढे पाड्यागणिक तिचा थांबा सुरु व्हायचा. गाडी थांबली की उंघडेबंब वनवासी बांधव डब्यात लाकडाच्या मोळ्या कोंबायचे. दरवाजात उभ्या एखाद्या प्रवाशाने हटकले तर त्याच्याशी झोंबाझोंबीही व्हायची. 'वाई वाई हुरक'(थोडं थोडं सरक) असा प्रेमाचा सल्लाही मिळायचा. असं चित्र नित्याचं. आता जंगलही तुटलं, उघडा बोडका सातपुडा नि सह्याद्रीचा मिलाफ जेथे होतो त्या नंदुरबार जिल्ह्यातील वनवासींवर तेथून परागंदा व्हायची वेळ येऊन ठेपली. पण अलिकडे थोडा बदल जाणवू लागला आहे. पॅसेंजर मध्ये लाकडाची मोळी कोंबणारा वनवासी बंधू आता भाजीपाल्याचे ओझे सुरतेकडे नेऊ लागला आहे. हा बदल असा अचानक झाला का? ह्या बदलामागे शासनाच्या कृषी खात्याची करामत आहे का? ह्याची उत्तरे ज्याने त्याने शोधावित. परंतु मला या बदलामागे काहीना काही प्रमाणात नंदुरबारचे कृषी विज्ञान केंद्र असल्याचे जाणवले. व्यक्तिच्या मोठेपणापेक्षा समाजाला, संस्थेला मोठं माणणाऱ्या डॉ. हेडगेवार सेवा समिती संचालित या विज्ञान केंद्राने नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल करायला सुरुवात केली आहे. त्यात समितीच्या संचालक मंडळाचा सहभाग आहेच, परंतु विज्ञान केंद्राच्या कार्यासाठी स्वत:ला वाहून घेणाऱ्या डॉ. गजानन डांगेचा सहभाग अधिक महत्वाचा आहे.

महाराष्ट्रातील दुर्गम वनवासी भागापैकी एक नंदुरबार जिल्हा. वनवासींसाठी विविध योजना या भागात कार्यरत असल्या तरी या भागातील शेतकऱ्यांसाठी सन २००० पर्यंत फारसे प्रयत्न झाले नव्हते. डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या माध्यमातून सुरु झालेल्या कृषी विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांसाठी विविध प्रकारचे तंत्रज्ञान विकसित केले जाऊ लागले. त्या भागातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ व्हावा हाच त्यामागील शुद्ध हेतू. सरकार दरबारी पूर्ण डाक्युमेंटेशन, उत्तम रिर्पोटिंग आणि उत्तम काम या कार्यपद्धतीमुळे या विज्ञान केंद्राला सर्वच पातळीवरुन पाठिंबाही लाभला.

डॉ. गजानन डांगे पावणे सहा किंवा सहा फूट उंचींचं एक प्रसन्न व्यक्तिमत्व. डॉक्टर तिकडे मराठवाड्याकडचे असावेत असा माझा आजवरचा तर्क. परंतु ते मुळचे नंदुरबारचेच. वडिल पेशाने शिक्षक. त्यामुळे डांगे कुटुंब तसं पांढरपेशा वर्गातलं. परंतु वडिल इंग्रजीच्या शिकवण्या घ्यायचे. त्यामुळे वडिलांचा आणि ओघानेच गजानन डांगेंचा नंदुरबार परिसरातील शेतकरी आणि शेतीशी संबंध येऊ लागला. पुढे नागपूरला त्यांनी पशुवैद्यकीचं शिक्षण घेऊन नंदुरबार तालुक्यातील करंजकुपे या छोट्याशा गावात खाजगी दवाखाना सुरु केला. तो काळ होता १९९३चा. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तेव्हा गुरांचा सरकारी दवाखानाच तेवढा माहित. डॉ. डांगेनी मात्र एका खेड्यात खाजगी दवाखाना सुरु केला. करंजकुप्याच्या जवळच एका गावात तेव्हा वनवासी कल्याण आश्रमाचं वसतीगृह होतं. नंदुरबारचा एक कार्यकर्ता डांगेंच्या मोटारसायकलवर बसून त्या गावाला–वसतीगृहात नेहमी जायचा. त्यानिमित्ताने वनवासी कल्याण आश्रमाशी त्यांचा संपर्क आला. संपर्क वाढला. अशात कल्याण आश्रमाने वनयोगी बाळासाहेब देशपांडे स्मृती अभियान राबविले. तेव्हा नंदुरबार जिल्ह्यातील अभियान समितीच्या सचिव पदाची जबादारी त्यांच्याकडे आली. समितीचे कार्याध्यक्ष होते प्रा. नवले. दोघांना प्रवासाची आवड असल्याने त्यांचा सातपुड्यात प्रवास सुरु झाला. या प्रवासातून सेवा प्रकल्पाची संकल्पना जन्माला आली. नंदुरबारमध्ये १९९१ पासूनच ललित पाठकांच्या अध्यक्षतेखाली डॉ. हेडगेवार सेवा समिती स्थापन झालेली होती. या समितीच्या माध्यमातून काही प्रकल्प सुरु करावेत असे ठरले. त्यासाठी सरकारचा सहयोग घ्यावा असा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. तेव्हा डॉ. डांगे करंजकुप्याला दवाखाना चालवायचे व नंदुरबारला एका महाविद्यालयात 'पशुधन पर्यवेक्षक'या अभ्यासक्रमासाठी

शिकवायचेही. कुटुंबाची पार्श्वभुमी शेती व ग्रामीण नसली तरी व्यवसाय व शिक्षणाच्या निमित्ताने व नंतर वनवासी कल्याण आश्रमाशी संपर्क आल्याने ग्रामीण जीवनाचा त्यांना चांगलाच परिचय झाला. ग्रामीण,वनवासी समस्यांचा त्यांनी जवळून अभ्यासही केला. परंतु प्रकल्प सुरु करायचा तर त्यासाठी पूर्णवेळ देणे अवश्यक होते. म्हणून डॉक्टरांनी करंजकुप्याचा दवाखाना बंद केला आणि नंदुरबारची नोकरीही थांबवली. डॉ. हेडगेवार सेवा समितीच्या प्रकल्पांसाठी पूर्णवेळ काम करावं असं ठरलं. ते वर्ष होतं १९९७. सुरुवातीला ग्राम शिक्षण मंदिरासारखे प्रकल्प सुरु झाले.

देशात कृषि तंत्रज्ञानात सातत्याने बदल होत आहेत. ते बदल त्या त्या भागात आत्मसातही केले जात आहेत. परंतु नंदुरबारसारख्या दुर्गम वनवासी भागात हे तंत्रज्ञान पोहोचण्याची व्यवस्था नाही. हे लक्षात आले आणि तेव्हाच नंदुरबारला' कृषी विज्ञान केंद्र सुरु करावे ही योजना पुढे आली.सुरवातीला विज्ञान केंद्रासाठी प्रपोजल सादर केलं. नंतर महाराष्ट्रातील बाभळेश्वर,बारामती,जळगाव आदी कृषी विज्ञान केंद्रांना भेटी दिल्या. २००१ या वर्षी नंदुरबारला कृषी विज्ञान केंद्र सुरु करण्याची डॉ. हेडगेवार सेवा समितीला परवानगी मिळाली. तेव्हापासून डॉ. डांगेनी विज्ञान केंद्रासाठी पूर्णवेळ काम सुरु केलं. केंद्राचे कायक्रम समन्वयक ही जबाबदारी घेऊन डॉक्टर काम करु लागले.

कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान पुरविणं, तंत्रज्ञानात बदल करणे आणि ते बदल संशोधन केंद्राकडे द्यायचे यात केंद्राचा स्ट्राँग पाँइट आहे ते केंद्राचं प्रक्षेत्र (प्रात्यक्षिक क्षेत्र). ते विकसित करतांना डॉ. डांगेंनी आपले सहकारी व परिसरातील असंख्य शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यातून केंद्राचं प्रक्षेत्र विकसित झालं.

या भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात नवनवीन बदल घडवून आणता यावेत यासाठी मार्गदर्शन जेव्हा केले जाते, त्यावेळी शेतकऱ्यांचा एक प्रश्न असतो की ज्या ठिकाणचे प्रात्यक्षिक दाखविले जाते ते क्षेत्र फार छोटे असते. त्या छोट्या क्षेत्रापुरते काम सफाईदारपणे, स्वच्छ असे करता येते. परंतू मोठ्या क्षेत्रात ते कसे साधणार? कृषी विज्ञान केंद्राने त्यासाठीही प्रयोग केले. एकेका एकरावर तसे प्रयोग केले जाऊ लागले. आणखी काही प्रश्न उपस्थित झाले. सर्वच शेतकऱ्यांची शेती बागायती अगर कोरडवाहू नसते. कोरडवाहू शेतीत व बागायती शेतीतील प्रयोग वेगवेगळे असावेत यासाठी केंद्रात तीन वेगवेगळे प्रयोग केले. त्यात १०० टक्के पाण्यावरील बागायती क्षेत्र, ५० टक्के पाण्यावरचे क्षेत्र व कोरडवाहू क्षेत्र अशा तीन विभागात संशोधन करुन ते शेतकऱ्यांसमोर मांडले. अशा विकसित झालेल्या प्रक्षेत्राच्या पाहणीसाठी देशातील ५५ कृषी विज्ञान केंद्रातील प्रमुखांच्या कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

विज्ञानकेंद्रातील संशोधनांचा, प्रयोगांचा शेतकऱ्यांना आपल्या शेतात उपयोग करता यावा यासाठी दरवर्षी सप्टेंबर–ऑक्टोबर महिन्यात कृषी तंत्रज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व बचत गट, शासकीय अधिकारी व शास्त्रज्ञांना आमंत्रित केले जाते. या सप्ताहाला दरवर्षी अतिशय उत्तम प्रतिसाद लाभतो. या यशस्वी आयोजनाची शासकीय पातळीवर दखल घेतली गेली असून देशातील सर्वच कृषी विज्ञान केंद्रांनी असा सप्ताह दरवर्षी आपापल्या ठिकाणी आयोजित करावा असे सर्क्युलर शासनाने काढले आहे. आज नंदुरबारचे हे कृषी विज्ञान केंद्र या भागातील वनवासी, बिगर वनवासी शेतकरी, बचत गटातील महिला व शासन यांच्यातला दुवा ठरले आहे. शासनाला कोणताही कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवायचा असेल तर त्यांना डॉ. हेडगेवार सेवा समितीद्वारा संचालित कृषी विज्ञान केंद्राचा माध्यम म्हणून उपयोग होतो आहे. त्यात पुढील काही कार्यक्रमांचा समावेश आहे. 'बचत गटाच्या माध्यमातून कांदा बिजोत्पादन'हा विज्ञान केंद्राने राबविलेला सर्वात यशस्वी उपक्रम ठरल्याचे डॉ. डांगे सांगतात. भारतात अशा प्रकारचा पहिलाच प्रयोग असून तो शंभर टक्के यशस्वी झाला.

जागतिक बँक अनुदानित व विविध विद्यापीठांचा सहभाग असलेल्या शाश्वत ग्रामीण उपजिविका सुरक्षा प्रकल्पाचा समावेश आहे. सातपुड्यातील वनवासींच्या अन्न सुरक्षिततेचा प्रयोग संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत आहे. विज्ञान केंद्राचा त्यात सहभाग आहे.नाबार्डच्या ग्राम उत्थान कार्यक्रमात प्रत्यक्ष कृषि ग्राम विकासाला चालना मिळावी यासाठी विज्ञान केंद्रामार्फत कार्यक्रम राबविला जातो.'नरेगा' म्हणजेच राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना. या नरेगालाही टेक्नॉलॉजी पुरविण्याचे काम देशातील ५० पैकी फक्त नंदुरबारच्यात विज्ञान केंद्राला मिळाले आहे.

या विज्ञान केंद्राला अल्पावधीत विकसित करण्यात आणि जिल्ह्यातील वनवासी–बिगर वनवासी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र म्हणून पुढे आणण्यात संस्थेच्या संचालक मंडळाचा मोठा वाटा आहेच. परंतु सेवाभाव हा गुण अंगी असलेल्या डॉ. गजानन डांगे यांचे त्यात फार मोठे योगदान आहे. फक्त या लेखाच्या माहितीवर विश्वास ठेवू नका प्रत्यक्ष विज्ञान केंद्राला भेट दिली तर ते प्रत्यक्षच आपल्याला अनुभवायला मिळेल.